अतिक्रमण/अनाधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग
पुणे महानगरपालिका
दिनांक : ०६/०४/२०२६

प्रेसनोट

मा. महापालिका आयुक्त यांचे आदेशानुसार मा. श्री. सोमनाथ बनकर, उप आयुक्त, अतिक्रमण/अनाधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग, मा.श्री. डॉ. रमेश शेलार, मुख्य सुरक्षा अधिकारी तथा सहाय्यक अतिक्रमण/अनाधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग प्रमुख, यांच्या नियंत्रणाखाली पुणे औंध-बाणेर परिसरातील अभिमान सोसायटी सर्जा हॉटेल लेन रिलायन्स फ्रेश सिग्नेचर कोंढवा बुद्रुक येथे सोमवार दि.०६/०४/२०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता अनधिकृत बांधकाम निर्मुलन कारवाई सुरु करण्यात आली. सदर कारवाईकरिता बांधकाम निर्मुलन विभागाकडील श्री विजय पाटील श्री.किरण देसले, श्री.विरेंद्र टिळेकर, श्री.विक्रम क्षिरसागर कनिष्ठ अभियंता बांधकाम विकास विभाग व श्री.रंजित मुटकुले उप अभियंता बांधकाम विकास विभाग, उपस्थित होते. सदर कारवाईत एकूण १८,००० चौरस फूट अनधिकृत कच्चे/पक्के बांधकाम निष्कासित करण्यात आले.

सदर कारवाईकरिता पुणे मनपा पोलीस कर्मचारी-०५ , एम.एस.एफ.जवान-२५ , जेसीबी- ३, गॅसकटर- २, ब्रेकर- २, बिगारी सेवक :-४० यांच्या मदतीने कारवाई करण्यात आली.